सत्यमेव जयते

**डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी), पुणे**
(महाराष्ट्र शासनाच्या सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाची स्वायत्त संस्था)
मुख्यालय : २८ क्वीन्स गार्डन, कॅम्प, पुणे - ४११००१

दूरध्वनी क्र. ०२०-२६३४३६०० / २६३३३३३० /२६३३३३३९ Website:- www.barti.in E-mail: - dg@barti.in

जा.क्र./बाटा/याजना/JEE/NEET/२०२५-२६/ ७१२७ दिनाक :- २९/१०/२०२५

# जेईई (JEE) व नीट (NEET) प्रशिक्षणासाठी निवड झालेल्या उमेदवारांकरिता समुपदेशन पोर्टल (Counseling Poral) बाबत महत्वाची सूचना

डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था, (बार्टी) पुणे मार्फत महाराष्ट्र राज्यातील अनुसूचित जातीतील (मातंग व इतर तत्सम मांग, मातंग मिनिमादिग, दखनी- मांग, मांग-म्हशी, मदारी, गारुडी, राधेमांग, मांग गारोडी, मांग गारुडी, मादगी व मादिगा या जाती वगळून) उमेदवारांना बार्टी मार्फत जेईई (JEE) व नीट (NEET) परीक्षेचे पूर्व प्रशिक्षण देण्यात येत आहे. त्याअनुषंगाने पुणे, मुंबई, नाशिक, छ. संभाजीनगर, लातूर, अमरावती व नागपूर या ठिकाणी प्रत्येकी जेईई (JEE) प्रशिक्षणासाठी ७५ व नीट (NEET) प्रशिक्षणासाठी ७५ विद्यार्थ्यांची निवड करण्याकरिता बार्टी मार्फत दि. २५/०६/२०२५ रोजी जाहिरात प्रसिध्द करण्यात आली. सदर जाहिरातीद्वारे दिनांक २०/०८/२०२५ पर्यंत ऑनलाईन अर्ज/ नोंदणी करण्याबाबत नमूद करण्यात आले होते. त्याअनुषंगाने उमेदवारांच्या प्राप्त ऑनलाईन माहितीच्या आधारे बार्टी मार्फत दिनांक ०४/०९/२०२५ रोजीच्या घोषणापत्रकानुसार पुणे, मुंबई, नाशिक, छ. संभाजीनगर, लातूर, अमरावती व नागपूर या ठिकाणासाठी जेईई (JEE) व नीट (NEET) करिता तात्पुरती निवड यादी व प्रतीक्षा यादी प्रसिद्ध करण्यात आलेली असून विद्यार्थ्यांची कागदपत्राची तपासणी करण्यात आलेली आहे.

दिनांक ०४/०९/२०२५ रोजीच्या घोषणापत्रकानुसार निवड झालेल्या उमेदवारांना त्यांच्या पसंतीची प्रशिक्षण केंद्राची निवड करण्याकरीता पोर्टल तयार करण्यात आलेले आहे. सदर पोर्टल च्या माध्यमातून उमेदवारांनी आपल्या पसंतीची प्रशिक्षण केंद्राची निवड करावी.

ज्या प्रशिक्षणाच्या ठिकाणी उमेदवाराची निवड झालेली आहे त्या ठिकाणासाठी नामनिर्देशित खाजगी नामांकित प्रशिक्षण केंद्राचे विकल्प देण्याची सुविधा उपलब्ध होईल. जितके प्रशिक्षण केंद्रे नमूद आहेत त्या सर्वांना उमेदवारांनी पसंतीक्रम/विकल्प (Preference) द्यायचा आहे. सर्व प्रशिक्षण केंद्रांना पसंतीक्रम/विकल्प दिल्यानंतर OTP द्वारे सदर पसंतीक्रम/विकल्प अंतिम केल्यानंतरच आपले पसंतीक्रम/विकल्प Submit करण्याचा Tab कार्यान्वित होईल. Submit वर click केले असता आपले पसंतीक्रम/विकल्प नोंद होऊन त्याची Acknowledgement Receipt (पोच पावती) तयार होईल.

**सदर प्रमाणे प्राप्त झालेले पसंतीक्रम्/विकल्प हे अंतिम असून त्यात कोणताही बदल करता येणार नाही, सबब उमेदवारांना सूचित करण्यात येते की त्यांनी प्रशिक्षण केंद्राची निवड अत्यंत काळजीपूर्वक करावी तसेच प्रशिक्षण केंद्राचे विकल्प हे त्यांच्या संदर्भातील उपलब्ध माहिती View Details Tab मधून वाचून त्यानंतरच भरावे. प्रशिक्षण केंद्राची संपूर्ण माहिती घेऊनच तसेच कोणत्याही प्रकारच्या प्रलोभनास बळी न पडता प्रशिक्षण केंद्राची निवड करावी**.

प्रशिक्षण केंद्राच्या निवडीकरिता ऑनलाइन विकल्प देण्यासाठी https://cpetp.barti.in/ या लिंक वरून लॉगीन करणे आवश्यक आहे. त्यासाठी उमेदवारांनी प्रवेश अर्ज (Application Form) भरताना वापरलेल्या Email ID व Password यांचा वापर करावा. उमेदवारांनी सदर इमेल व मोबाईल क्रमांक चालू स्थितीत ठेवणे आवश्यक आहे.

सदर पोर्टल **बुधवार दिनांक २९/१०/२०२५ पासून शुक्रवार दिनांक ३१/१०/२०२५** पर्यंत सुरु राहील. त्यानंतर कोणत्याही स्वरूपात मुदतवाढ देण्यात येणार नाही याची उमेदवारांनी नोंद घ्यावी.

स्वाक्षरी/-

(सुनील वारे)

**महासंचालक**

**डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था, (बार्टी) पुणे**.